**नियमीत दिवाणी दावा क्र. ६५१/२०२३**

रेखाबाई गुलुमकर वि. जिल्हाधिकारी

CNR No. MHSO100014842023

## निशाणी ६५ खालील आदेश

कोर्ट कमिशनरची नियुक्ती करण्यासाठी अर्ज केला आहे.

२. थोडक्यात अर्ज आहे की, प्रतिवादी हे महाराष्ट्र शासनाच्या निविदेप्रमाणे माळखांबी–जांबूड रोड याचे काम करत नाहीत. सदर रस्त्याचे काम नियमाप्रमाणे व रस्त्याच्या मुळ रेखांकनानुसार करणे जरुरीचे आहे. सदर रस्ता पूर्णपणे विठ्ठलवाडी हद्दीतून निविदेप्रमाणे जात आहे. प्रतिवादी हे वादीचा गट नं. ५९८ या जमिनीतून सदर रस्ता बेकायदेशीर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. रेखांकन रस्त्यावर गट क्र. ११२, ११३, ११७/१/अ/४, ११९ व १२८ या जमिनीच्या मालकांनी अतिक्रमण करुन विहीरी पाडल्या आहेत. त्यामुळे, प्रतिवादी मुळ रेखांकनानुसार विठ्ठलवाडी हद्दीतून रस्ता न करता जांबूड हद्दीतून रस्त्या करण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादीने प्रतिवादीला रस्त्याचे स्केच, नकाशा दाव्यात दाखल करण्याचा अर्ज दिला होता. परंतु, ते दस्ताऐवज त्यांनी दाखल केले नाही. विठ्ठलवाडी व जांबूड यांची शिव कशी आहे, सदर शिवेची मोजणी होवून जांबूड हद्द व विठ्ठलवाडी हद्द स्पष्ट नकाशात दाखविण्यासाठी उप–अधिक्षक भूमि अभिलेख, माळशिरस यांचेमार्फत मोजणी होवून शिवेची हद्द कायम होवून मिळण्यासाठी मोजणी होणे गरजेचे आहे. म्हणून अर्ज मंजूर करावा.

३. प्रतिवादीने निशाणी क्र. ७४ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. गट नं. ११२, ११३, ११९ व १२८ या जमिनी कुठल्या गावाच्या हद्दीत आहेत याचे स्पष्टीकरण वादीने दिले नाही. सदर गट नंबरचे मालक या दाव्यात प्रतिवादी म्हणून सामील नाही. विठ्ठलवाडी व जांबूड याची शिव कशी आहे याबद्दलचा मजकूर दाव्यात नमूद नाही. या अर्जामध्ये मुळ दाव्याच्या मजकूराशिवाय वेगळी विनंती करता येणार नाही. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. मी वादी व प्रतिवादीचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. मी वादपत्राचे अवलोकन केले. वादपत्रातील परिच्छेद क्र. ३ मध्ये वादीने नमूद केले आहे की, सदरील रस्ता रेखांकनानुसार न करता जांबूड हद्दीतून वादीचा सर्व्हे नं. १५७, १५८ याचा गट नं. ५९८ या जमिनीतून बेकायदेशीरपणे काढण्याचा प्रयत्न प्रतिवादी करत आहेत. वादीचा दावा कलम १ मधील गट क्र. २५२/१, २५२/२, ५९८/१/अ/३, ५९८/१/अ/१, ५९८/१/अ/२ व ५९८/३ स्थित मौजे जांबूड, तालुका माळशिरस या जमिनीतून दंड बुजवून, झाडेझुडपे तोडून, कॅनॉलचे पाणी वादीच्या जमिनीमध्ये व घरामध्ये सोडून वादीला दमदाटी करीत आहेत. गट नं. ११२, ११३, ११७/१/अ/४, ११९ व १२८ या लोकांनी रेखांकित रस्त्यावर विहीर पाडलेली आहे आणि हे गट नंबर विठ्ठलवाडी क्षेत्रात येते. त्यामुळे, प्रतिवादीने विठ्ठलवाडी हद्दीतील रस्ता सोडून जांबूड हद्दीतून

वादीच्या जमिनीतून बेकायदेशीरपणे नवीन रस्ता काढण्याचा प्रयत्न करीत आहेत. या कथनावरुन दोन्ही गावातील शिव वादग्रस्त नाही. वादीच्या गट नंबरमधून प्रतिवादी रस्ता काढतात का हे पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे, तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडुन विठ्ठलवाडी व जांबूड यांची शिव कशी आहे व जांबूड हद्द विठ्ठलवाडी हद्द कायम करावी हे याठिकाणी गरजेचे नाही. फक्त वादीच्या वर नमूद मिळकतीतून प्रतिवादी रस्ता काढतात का हे पाहणे गरजेचे आहे. दाव्याचे स्वरुप पाहता व तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज निशाणी क्र. ५ हा प्रलंबित आहे. त्यामुळे, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडून मोजणी करुन घेण्यापेक्षा विधिज्ञाकडुन वादीच्या मिळकतीतून रस्ता जातो का हे पाहणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतोः–

## <u>आदेश</u>

१. वादीच्या वर नमूद मिळकतीतून रस्ता जातो का हे पाहण्यासाठी जेष्ठ विधिज्ञ श्री. डी. एस. आडत यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांनी वादीच्या वर नमूद मिळकतीतून प्रतिवादी क्र. १ ते ५ रस्ता काढतात का हे पहावे व त्याचा अहवाल नकाशासह दिनांक ०२.०५.२०२३ पर्यंत दाखल

करावा.

२. कोर्ट कमिशन फी रुपये ७,५००/– वादी क्र. १ ते ७ यांनी भरावी. त्यानंतर याचीका काढावी.

स्थळ – माळशिरस. **( यु. व्ही. जोशी )**
दिनांक – २४/०४/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.